सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३६ | शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

३१ ऑक्टोबर

- पुण्यातील आनंदोद्भव थिएटरमधे किर्लोस्करांच्या संगीत शाकुंतल या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
- नारायण मल्हार जोशी, लाला लजपतराय व इतर काही जणांनी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना केली. लाला लजपतराय पहिले अध्यक्ष बनले.
- दिल्ली उच्च न्यायालयाची स्थापना झाली.
- पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांकडून हत्या.
- राजीव गांधी यांनी भारताचे ६ वे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.
- मानवाची जागतिक लोकसंख्या सात अब्जांवर पोहोचली. हा दिवस संयुक्त राष्ट्रांनी सात अब्जांचा दिवस म्हणून ओळखला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!



राष्ट्रीय एकता दिन : अखंड भारताची ओळख

...पान ३ वर

योगी पुरुष : सद्गुरू शंकर महाराज

...पान ४ वर

## चिखलमय अमळनेर...!



अमळनेर शहरातील अयोध्या नगर आणि गायत्री नगर परिसरात चिखलाचे साम्राज्य आहे. पालिकेने अयोध्या नगरपर्यंतच रस्ता तयार केला आहे. पुढील रस्ता अर्धवट सोडला आहे. यामुळे चिखलाचा अक्षरशः थरवर थर साचला आहे. परिसरातील नागरिकांना चालणेही मुश्किल झाले आहे. नागरिकांनी घरातच राहणे पसंत केले आहे. वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. याकडे पालिकेने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे. (छायाचित्रे : संदीप पाटील)

# पुढील तीन-चार दिवस खूपच धोक्याचे;

# उत्तर महाराष्ट्रासह खानदेशात मुसळधार पाऊस

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

महाराष्ट्रातील हवामानाच्या परिस्थितीत आगामी काळात महत्त्वपूर्ण बदल होणार असल्याचे हवामान तज्ज्ञांनी संकेत दिले आहेत. राज्यातील नागरिकांना पावसाच्या तीव्रतेसह थंड हवामानाच्या आगमनाची तयारी करावी लागणार आहे. दरम्यान, उत्तर महाराष्ट्रासह खानदेशात या काळात मुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता हवामान विभागातर्फे वर्तविण्यात आली आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या वातावरणीय परिस्थितीमुळे आणि सागरी भागात सक्रीय चक्रीवादळामुळे आगामी तीन ते चार दिवस राज्यभरात मुसळधार पाऊस कोसळणार आहे. ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरपर्यंत राज्यात पावसाचे वातावरण कायम राहणार आहे. विदर्भातील पूर्व आणि पश्चिम भागांसह दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र संपूर्ण कोकणपट्टी, खानदेश आणि मराठवाडा यासर्व प्रदेशांमध्ये मुसळधार पाऊस पडेल.

राज्याची राजधानी मुंबई आणि पुणे सारख्या महानगरांसह ग्रामीण भागातही पावसाचे सावट असणार आहे.

हवामान बदलाचा परिणाम मुंबई, पुणे, नाशिकसह नांदेड, वाशिम, हिंगोली, यवतमाळ, परभणी आणि लातूर या जिल्ह्यांवर मोठ्या प्रमाणावर होणार असून सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, छ. संभाजी नगर, जालना, नंदुरबार, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांमध्येही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे आगामी काही दिवस शेतकऱ्यांसह नागरिकांनी विशेष सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत हवामान तज्ज्ञांनी व्यक्तत केले आहे.

# शासनाने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी

## तहसीलदारांना निवेदन; बच्चू कडूंच्या राज्यव्यापी आंदोलनास पाठिंबा

ग्लोबल महातेज वृत्तसवा

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी यासाठी माजी आमदार बच्चू कडू यांचे राज्यव्यापी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनात अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला आहे. याबाबत किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष पाटील यांच्या नेतृत्वात गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की शेतकऱ्यांच्या विविध समस्या, सततची नैसर्गिक आपत्ती, त्यातून उद्भवलेले आर्थिक संकट यामुळे राज्यातील बळीराजा आर्थिक



तणावाखाली आहे. शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाले आहेत. त्यांना तातडीने आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. राज्य शासनाने कर्जमाफी द्यावी. सद्यस्थितीत प्रहार जनशक्ती पक्षाचे माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास तालुक्यातील शेतकऱ्यांचा पूर्णपणे पाठिंबा आहे. निवेदनावर चंद्रशेखर भावसार, प्रताप पाटील, धनगर पाटील, प्रा. सुभाष पाटील, वसंतराव पवार, मोहन भोई, प्रकाश धनगर, कैलास पाटील, गोकूळ कोळी, ज्ञानेश्वर पाटील, सुरेश पाटील, गोरख पाटीलख, कृष्णा पाटील, शालीग्राम पाटील, योगेश्वर पाटील, महेश पाटील, निळकंठ पाटील यांच्या सह्या आहेत.

### अवकाळीचा फटका; पिके पाण्यात

दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांना पुन्हा फटका बसला आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने उरली- सुरली पिकेही पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे शेतकरी रडकुंडीला आले आहेत. बहुतांश भागांत शेतकऱ्यांनी मका शेताच्या बांधावर काढून ठेवला होता. मात्र, मुसळधार पावसाने तो भिजून वाया गेला आहे. पावसामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणेही मुश्किल झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली जात आहे.

# सोने-चांदीच्या दरात घसरण; ग्राहकांना मिळाला दिलासा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सुवर्ण बाजारपेठेत बुधवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली होती. त्यामुळे ग्राहकांसह व्यावसायिकांत खळबळ उडाली होती. मात्र, गुरुवार रोजी सकाळी या दोन्ही धातूंच्या दरात मोठी घसरण झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

जळगावच्या सुवर्ण बाजारपेठेत बुधवारी दोन हजार ६६ रुपयांनी वाढ नोंदविली गेली. त्यामुळे सोने जीएसटीसह प्रतितोळा एक लाख २४ हजार ६३० रुपयांपर्यंत पोहोचले. तर गुरुवारी सकाळी बाजार उघडताच पुन्हा एक हजार ५४५ रुपयांची दरात घसरण झाली. त्यामुळे सोने जीएसटीसह प्रतितोळा एक लाख २३ हजार ८५ रुपयांपर्यंत घसरले.

तज्ज्ञांच्या मते दिवाळीपासून सोने आणि चांदीच्या दरात मोठे

पान ३ वर

### चांदीत दोन हजार रुपयांची घट

बुधवारी चांदीच्या दरात पाच हजार १५० रुपयांनी वाढ झाली होती. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह प्रतिकिलो एक लाख ५४ हजार ५०० रुपयांपर्यंत पोहोचले होते. मात्र गुरुवारी सकाळी बाजार उघडताच पुन्हा दोन हजार रुपयांनी दरात घसरण झाली. त्यामुळे चांदीचे दर जीएसटीसह प्रतिकिलो एक लाख ५२ हजार ४४० रुपयांपर्यंत आले.




# दिवाळीत लाल परीला मोठा प्रतिसाद; अमळनेर आगार मालामाल

## तब्बल ८६ लाखांचे मिळाले उत्पन्न, लाडक्या बहिणींचा मोठा सहभाग

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आपापल्या गावी जाणाऱ्या प्रवाशांची रेलचेल वाढली आहे. अर्धे तिकीट लागत असल्याने एसटी बसस्थानकांवर महिला प्रवाशांची मोठी गर्दी होते. २२ ऑक्टोबरपासून बस स्थानकाहून बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. विशेष म्हणजे यामध्ये महिलांची संख्या अधिक आहे. यंदाच्या दिवाळीत सात दिवसात येथील बस आगाराला तब्बल ८६ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे.

राज्य परिवहन महामंडळातर्फे विविध प्रकारच्या प्रवास भाड्यात सवलतीच्या योजना राबविल्या जातात. यामध्ये महिला सन्मान योजनेंतर्गत महिलांना प्रवासभाड्यावर ५० टक्के सूट आहे. महिला प्रवाशांची संख्या धनत्रयोदशीपासून वाढली होती. विशेष म्हणजे मागील काही दिवसांपासून दिवाळी सणामुळे बस मधून प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांच्या संख्येत ४० ते ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ग्रामीण भागात जाणाऱ्या बससाठीही विशेष फेऱ्या सुरु आहेत.

गर्दी असूनही बसची उपलब्धता आणि सोईस्कर बस थांबे यामुळे अनेकांना रेल्वेपेक्षा एसटीचा प्रवास अधिक सोयीचा वाटतो.

पान ३ वर

"यंदाच्या दिवाळीत २२ ऑक्टोबरपासूनच २७ ऑक्टोबरपर्यंत बसमधून प्रवास करणाऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. अमळनेर आगारात उत्पन्नात गेल्या वर्षाच्या तुलनेत दुपटीने वाढ झालेली आहे. आगारातील गाड्या दोन लाख ५१ हजार १३ किलोमीटर धावल्या आहेत. यातून आगाराला ८६ लाख ४९ हजार ६३४ रुपयांचे उत्पन्न मिळाले.

– पी. बी. चौधरी, आगार प्रमुख, अमळनेर






# सफरचंद सालीसकट खावे की सोलून? जाणून घ्या...!

## आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला आणि योग्य पद्धत



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सफरचंद हे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर फळ आहे. त्यात फायबर, व्हिटॅमिन्स आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. ते सालीसकट खावे की सोलून, याबाबत अनेकांना संभ्रम असतो. आधुनिक आहारशास्त्रानुसार सफरचंद सोलून खाणे अधिक फायदेशीर आहे. विशेषतः पचनाच्या समस्या असलेल्यांसाठी. चला जाणून घेऊया तज्ज्ञांचा सल्ला आणि फायदे.

**सफरचंद कसे खावेः सालीसकट की सोलून?**
बहुतेक लोक सफरचंद सालीसकट खातात, कारण सालीत पोषक तत्त्वे जास्त असतात असे समजले जाते. मात्र, वजन कमी करण्याचे तज्ज्ञ सुधीर अष्ट यांच्या मते, सफरचंद नेहमी सोलून खावे. त्यांनी एका पॉडकास्टमध्ये स्पष्ट केले, की साल फळाच्या अंतर्गत भागाचे संरक्षण करते, कीटक आणि बाह्य घटकांपासून वाचवते. पण सफरचंदाच्या सालीतील पोषक तत्त्वे गराशी मिसळल्याशिवाय शरीराला पूर्ण फायदा होत नाही. सालीसह खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवू शकतात, विशेषतः ज्यांना अपचन किंवा आयबीएससारख्या समस्या आहेत त्यांच्यासाठी.
सोलून खाण्याचे फायदे : सालीत कीटकनाशके किंवा मोमाचे अवशेष असू शकतात. जे धुतल्यावरही पूर्ण निघत नाहीत. सोलल्याने पचन सोपे होते. पोषक तत्त्वे सहज शोषले जातात.

**सर्व फळे सारखी नाहीत :** द्राक्षे किंवा बेरीसारखी फळे सालीसकट खाण्याचा सल्ला दिला जातो, कारण त्यांची साल पातळ आणि पोषक असते. पण सफरचंद, आंबा किंवा केळी सोलून खाणे चांगले. शास्त्रज्ञांच्या मते, सफरचंदाची साल फायबरयुक्त असली तरी ती कठीण असल्याने काहींना गॅस किंवा ब्लोटिंग होऊ शकते. म्हणून रोजच्या आहारात सोलून खा आणि चांगले धुवा.



### सफरचंद निवडणे आणि खाण्याच्या टिप्स

**निवड :** ताजे, चमकदार आणि कठीण सफरचंद घ्या. ऑर्गेनिक निवडा जेणेकरून कीटकनाशके कमी असतील. **खाण्याची वेळ :** सकाळी किंवा दुपारी खा, रात्री टाळा कारण फायबरमुळे अपचन होऊ शकते. प्रमाण : रोज १-२ सफरचंद पुरेसे. सोलून कापून सॅलडमध्ये मिसळा किंवा ज्यूस करा (पण गर काढून). **सावधानता :** कीटकनाशके टाळण्यासाठी चांगले धुवा किंवा सोलून खा. डायबिटीज असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.सफरचंद हे साधे फळ आरोग्याचा खजिना आहे. सोलून खाण्याची सवय लावा आणि निरोगी राहा.

### सफरचंदाचे आरोग्यदायी फायदे

"अन apple a day keeps the doctor away" ही म्हण खरे ठरते. सफरचंदात फायबर, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स (जसे क्वेरसेटीन) असतात. रोज एक सफरचंद खाल्ल्याने- **फायबर :** पचन सुधारते, कोलेस्ट्रॉल कमी करते आणि वजन नियंत्रित ठेवते. सालीसह खाल्ल्याने फायबर जास्त मिळते. मात्र सोलूनही गरात पुरेसे असते. व्हिटॅमिन सी : रोगप्रतिकार शक्ती वाढवते. त्वचा उजळवते आणि जखमा लवकर भरून काढते. **पोटॅशियम :** हृदयाच्या कार्यक्षमतेत सुधार करते, रक्तदाब नियंत्रित ठेवते आणि स्नायू मजबूत करते. **अँटीऑक्सिडंट्स :** मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करतात. ज्यामुळे कर्करोग, हृदयरोग आणि डायबिटीजचा धोका कमी होतो. अभ्यासानुसार (हार्वर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ), सफरचंद नियमित खाल्ल्याने हृदयरोग २०% कमी होतो आणि पचनक्रिया मजबूत होते.

# ११ वर्षांपासून चित्रपट नाही, तरीही लाखोंची कमाई; रेखा यांची संपत्ती किती?



**लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री रेखा यांनी आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने लाखो चाहत्यांची मने जिंकली आहेत. गेली ११ वर्षे त्या चित्रपटांपासून दूर असल्या, तरी त्यांची लोकप्रियता आणि संपत्ती आजही चर्चेचा विषय आहे. साधी राहणी आणि बडेजाव न करणारा स्वभाव यामुळे त्या खास ठरतात.

**रेखा यांची एकूण संपत्ती किती?**
रेखा यांची एकूण संपत्ती सुमारे ३३२ कोटी रुपये आहे. मुंबईतील बँड स्टँड येथे त्यांचा १०० कोटी रुपयांचा ' बसेरा ' नावाचा आलिशान बंगला आहे. याशिवाय त्यांच्याकडे रोल्स रॉयस घोस्ट (६.१ कोटी), ऑडी ए ४ (१.६३ कोटी), मर्सिडीज-बेंज एस-क्लास (२.१७), बीएमडब्ल्यू आय ७ (२.०३ कोटी) आणि एक इलेक्ट्रिक कार यांसारख्या लक्झरी कार आहेत. चित्रपटांपासून दूर असूनही रेखा ब्रँड एंडोर्समेंट, शो प्रमोशन आणि उद्घाटन समारंभ यातून दरवर्षी सुमारे ६५ लाख रुपये कमावतात. त्यांच्या काळात त्या सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक होत्या. अहवालानुसार त्या एका चित्रपटासाठी सुमारे १ कोटी रुपये आणि ब्रँड एंडोर्समेंटसाठी ५० लाख ते १ कोटी रुपये घेत असत.

**करिअर आणि यशाचा प्रवास**
रेखा यांचा जन्म १० ऑक्टोबर १९५४ रोजी चेन्नईत झाला. तेलुगू चित्रपटांतून त्यांनी बालकलाकार म्हणून करिअरची सुरूवात केली. १९७० मधील ' सावन भादो ' चित्रपटातून त्यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. ' मुकद्दर का सिकंदर ', ' खून भरी मांग ', ' खूबसूरत ', ' उमराव जान ', ' घर ', ' नमक हराम ', ' खिलाड़ियों का खिलाड़ी ', ' जीवन धारा ', ' मिस्टर नटवरलाल ', ' लज्जा ', ' जुदाई ', ' प्यार की जीत ', ' बहूरानी ', ' दो अनजाने ', ' बीवी हो तो ऐसी ' आणि ' कोई मिल गया ' यांसारख्या चित्रपटांनी त्यांना प्रचंड यश मिळवून दिले.
रेखा यांचा हा प्रेरणादायी प्रवास त्यांच्या प्रतिभेचे आणि मेहनतीचे द्योतक आहे. ज्यामुळे त्या आजही भारतीय चित्रपटसृष्टीतील एक आख्यायिका आहेत.

**रेखा यांना मिळणारे आर्थिक स्त्रोत**
१) जाहिराती आणि ब्रँड एंडोर्समेंट
२) मालमत्ता व गुंतवणूक
३) बँक व आर्थिक गुंतवणूक
४) पुरस्कार, इव्हेंट्स आणि रॉयल्टी
विविध अहवालांनुसार (२०२४ च्या अंदाजानुसार) रेखा यांची एकूण संपत्ती सुमारे ५ हजार ६० कोटी रुपयांदरम्यान असल्याचे मानले जाते. (ही आकडेवारी बदलू शकते, कारण त्यांनी त्यांच्या आर्थिक व्यवहारांविषयी सार्वजनिकरीत्या फारसे उघड केलेले नाही.)

# नवीन वाहतूक नियम : १ नोव्हेंबर २०२५ पासून दुचाकी चालकांसाठी कठोर दंड




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वाहतूक सुरक्षा वाढविण्यासाठी आणि नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी मोटर वाहन (सुधारणा) कायदा २०१९ अंतर्गत सरकारने नवीन नियम लागू केले आहेत. १ नोव्हेंबर २०२५ पासून हे नियम अधिक कठोर होणार असून, उल्लंघन करणाऱ्यांना मोठा दंड भरावा लागेल. वाहनचालकांनी या नियमांची आणि दंडाच्या रकमेची माहिती घेणे आवश्यक आहे. अन्यथा आर्थिक नुकसान होऊ शकते.

**ई-चलन प्रणाली**
वाहतूक विभागाने ई-चलन प्रणाली लागू केली आहे. जी डिजिटल उपकरणांद्वारे दंड जारी करते. यामुळे प्रक्रिया पारदर्शक आणि जलद झाली आहे. ई-चलन जारी झाल्यावर वाहनचालकाच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे माहिती पाठविली जाते.

**ई-चलन भरण्याचे पर्याय**
१) ऑनलाइन पेमेंट : वाहतूक विभागाच्या अधिकृत वेबसाइटवर (उदा.- Parivahan.gov.in) वाहन क्रमांक आणि चलन क्रमांक टाकून दंड भरा.
२) डिजिटल ॲप्स : पेटीएम, गुगल पे यांसारख्या ॲप्सद्वारे ई-चलन भरण्याची सोय उपलब्ध आहे.
३) वाहतूक पोलीस ठाणे : जवळच्या वाहतूक पोलीस ठाण्यात रोख किंवा कार्डद्वारे दंड भरण्याची सुविधा आहे.
हे नवीन नियम रस्ते सुरक्षा

### नवीन नियम आणि दंड

खालील तयात प्रमुख उल्लंघनांनुसार दंड आणि शिक्षेची माहिती दिली आहे.

| नियमाचे उल्लंघन | दंड/शिक्षा |
|---|---|
| विना हेल्मेट वाहन चालवण | १,०००/ रुपये- दंड आणि ३ महिन्यांसाठी परवाना रद्द |
| सीट बेल्ट न लावणे | १,०००/- रुपये दंड |
| दारू पिऊन वाहन चालवणे | १०,०००/- रुपये दंड आणि/किंवा ६ महिन्यांपर्यंत तुरुंगवास |
| विना परवाना वाहन चालवणे | ५,०००/- रुपये दंड |
| प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) नसणे | १०,०००/- रुपये दंड |
| वेग मर्यादा ओलांडणे | १,०००/- रुपये ते २,०००/- रुपये (वाहनाच्या प्रकारानुसार) |
| टीप : गंभीर किंवा वारंवार उल्लंघन केल्यास २५,०००/- रुपयांपर्यंत दंड किंवा अधिक कठोर शिक्षा होऊ शकते. | |



# अभ्यास केला नाही तर काय होईल? : चिमुकल्यांची मजेदार उत्तरे व्हायरल, शिक्षकही हसून लोटपोट!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभ्यास केला नाही तर काय होईल? हा शाळेतील शिक्षकांचा नेहमीचा प्रश्न एका व्हायरल व्हिडिओमुळे चर्चेचा विषय ठरला आहे. मुंबईतील एका शाळेतील चिमुकल्यांनी या प्रश्नाला दिलेली मजेदार आणि निरागस उत्तरे सध्या सोशल मीडियावर धमाल उडवत आहेत. या व्हिडिओने शिक्षकांना हसवले, तर नेटकऱ्यांनाही लोटपोट हसण्याची संधी दिली आहे.
व्हिडिओमधील मजेदार क्षण व्हायरल व्हिडिओमध्ये एक शिक्षिका वर्गातील लहान मुलांना उभे करून विचारते, की जर तुम्ही अभ्यास केला नाही तर काय होईल? यावर मुलांनी दिलेली उत्तरे ऐकून शिक्षिका आणि वर्गातील इतर विद्यार्थी हसून खाली पडले. एका मुलाने सांगितले, की अभ्यास केला नाही तर दुबईला जाऊ शकणार नाही. दुसऱ्या मुलाने गंभीर चेहरा करत म्हटले, की बुद्धी काम करणार नाही. एका मुलीने तर अतिशय व्यावहारिक उत्तर दिले, की अभ्यास केला नाही तर पैसे कमावता येणार नाही. पण सर्वांचे लक्ष वेधले ते एका चिमुकलीच्या उत्तराने. जिने सांगितले, की अभ्यास केला नाही तर मोठे होणार नाही. यावर वर्गात हशा पिकला. सर्वांत मजेदार ठरले ते एका मुलाचे उत्तर. अभ्यास केला नाही तर मम्मी थप्पड मारेल. हे ऐकून शिक्षिका आणि विद्यार्थी हसून-हसून लोटपोट झाले. या मुलांच्या निरागस आणि खट्याळ उत्तरांनी व्हिडिओला खास रंगत आणली.

**सोशल मीडियावर धमाल**
हा व्हिडिओ इन्स्टाग्राम युजरने शेअर केला आहे. आतापर्यंत त्याला २.३ कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. नेटकऱ्यांनीही यावर मजेशीर कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एका युजरने लिहिले, की मम्मी थप्पड मारेल, हे वैयक्तिक अनुभवातून आले. तर दुसऱ्या युजरने म्हटले, की ही मुले भविष्यात नक्की कॉमेडियन होतील. आणखी एकाने लिहिले, की प्रत्येक मुलाच्या तोंडी ' थप्पड ' हे उत्तर सूट करते. या व्हिडिओने सोशल मीडियावर खळबळ माजवली आहे. अनेकांनी हा व्हिडिओ पुन्हा पुन्हा शेअर केला आहे.

**शिक्षण आणि मस्तीचा मेळ**
शाळेत अभ्यासाचे महत्त्व सांगताना शिक्षक नेहमीच मुलांना भविष्याची स्वप्ने दाखवतात. पण या व्हिडिओतील मुलांनी आपल्या निरागस उत्तरांमधून अभ्यासाचे महत्त्व आपल्या पद्धतीने सांगितले. दुबईला जाऊ शकणार नाही किंवा पैसे कमावता येणार नाही ही उत्तरे मुलांच्या कल्पनाशक्ती आणि त्यांच्या घरी होणाऱ्या चर्चांचा परिणाम दाखवितात. यावरून हेही स्पष्ट होते, की मुले आपल्या आजूबाजूच्या वातावरणातून खूप काही शिकतात.

**शिक्षकांचे म्हणणे**
या व्हिडिओवर शिक्षकांनीही प्रतिक्रिया दिल्या असून, काहींनी सांगितले, की अशा मजेदार क्षणांमुळे वर्गातील वातावरण हलके होते. मुलांशी संवाद साधणे सोपे जाते. एका शिक्षिकेने सांगितले, की मुलांची ही निरागस उत्तरे ऐकून हसू येते. मात्र त्यातून त्यांचा विचार आणि त्यांच्या कुटुंबातील चर्चा समजते. यातून आम्हाला त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची संधी मिळते.

**नेटकऱ्यांचा उत्साह**
सोशल मीडियावर हा व्हिडिओ पाहिल्यानंतर अनेकांनी आपल्या शालेय आठवणी शेअर केल्या. काहींनी लिहिले, की आमच्या वेळी असे उत्तर दिले असते, तर शिक्षकांनीच थप्पड मारली असती. तर काहींनी मुलांच्या या मस्तीला पाठिंबा देत म्हटले, की अभ्यासाबरोबरच अशी मजाही मुलांच्या आयुष्यात हवी. हा व्हिडिओ सध्या इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर जोरदार शेअर होत आहे. हा व्हायरल व्हिडिओ मुलांच्या निरागसपणाचा आणि त्यांच्या खट्याळ स्वभावाचा एक सुंदर नमुना आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# राष्ट्रीय एकता दिन : अखंड भारताची ओळख



दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी भारतात ' राष्ट्रीय एकता दिन ' साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य म्हणजे भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिन. देशाच्या एकात्मतेचा पाया रचणाऱ्या या महान नेत्याच्या स्मरणार्थ संपूर्ण देशभर हा दिवस एकतेचा, संघटनेचा आणि राष्ट्रभावनेचा उत्सव म्हणून साजरा केला जातो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासमोर सर्वांत मोठे आव्हान होते देशातील असंख्य संस्थानांचे एकत्रीकरण. सरदार पटेल यांनी आपल्या दूरदृष्टी, राजनैतिक कौशल्य आणि दृढनिश्चयाच्या बळावर ५६५ पेक्षा अधिक संस्थानांना भारतात विलीन करून ' एक भारत' घडवला. त्यांच्या या योगदानामुळेच त्यांना ' भारताचे एकीकरणकर्ते ' म्हटले जाते.

राष्ट्रीय एकता दिन आपल्याला आठवण करून देतो, की भारताची खरी ताकद तिच्या विविधतेत आहे. मात्र ती विविधता एकतेनेच सुंदर बनते. जात, धर्म, भाषा, प्रांत यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक भारतीयाने राष्ट्रहिताला सर्वोच्च मानावे, हा संदेश या दिवसातून मिळतो.

देशभर या दिवशी ' रन फॉर यूनिटी ', शपथविधी, एकता परेड, तसेच विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये एकतेची शपथ घेतली जाते.

आजच्या काळात जेव्हा समाजात विभागणीच्या रेषा ठळक दिसतात तेव्हा सरदार पटेल यांच्या विचारांची आणि कार्याची आठवण विशेष महत्त्वाची ठरते. त्यांनी सांगितले होते, की आपला देश फक्त नकाशावर नाही, तो आपल्या मनात असायला हवा.'

राष्ट्रीय एकता दिन आपल्याला हाच संदेश देतो, की ' अखंड भारतासाठी प्रत्येकाने एकतेची मशाल आपल्या अंतःकरणात प्रज्वलित ठेवायला हवी.'

# सारबेटे खुर्दत घरफोडी; सुमारे अडीच लाखांचा ऐवज लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



तालुक्यातील सारबेटे खुर्द येथे एका शेतकऱ्याच्या घरात झालेल्या घरफोडीत २ लाख ३३ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. ही घटना बुधवार, दि. २९ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी भिमराव पूना पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे.

भिमराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, भिमराव पाटील व त्यांच्या पत्नी सौ. विठाबाई पाटील या मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी पिंपळगाव (ता. भडगाव) येथे त्यांच्या नातेवाईकांकडे मुक्कामी गेले होते. २८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री एकच्या सुमारास चोरट्यांनी घराचे कुलूप- कोयंडा तोडला. घरातून ६८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २९ भार वजनाचे चांदीचे दागिने व १५ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेले. तसेच भालचंद्र पाटील यांच्या घरीही घरफोडी झाली असून, तेथून चोरट्यांनी सहा ग्रॅम कानातील बाळ्या व ६ हजार ५०० रुपये रोख रक्कम लांबविली आहे. याप्रकरणी हवालदार रामकृषण कुमावत तपास करीत आहेत.

## सोने-चांदीच्या दरात घसरण

पान १ वरून

चढ-उतार पाहण्यास मिळाले. हा ट्रेंड जगभरात दिसून येत असून, जागतिक सराफ बाजारात सोन्याचे दर सातत्याने घसरत आहेत. धनत्रयोदशी ते लक्ष्मीपूजन या कालावधीत सोन्याचे दर बऱ्यापैकी वाढले होते. मात्र, जागतिक स्तरावरील घडामोडी पाहता आगामी काळात सोन्याच्या दरात आणखी घसरण होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली आहे. दरम्यान, सोन्याचे दर कमी होण्यामागे अनेक कारणे सांगितली जात आहेत. त्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे शी जिनपिंग यांच्यातील बैठकीदरम्यान अमेरिका-चीनमध्ये व्यापार करार होण्याची अपेक्षा हे मुख्य कारण मानले जात आहे. याशिवाय सुरक्षित आश्रयस्थान म्हणून डॉलर मजबूत होत आहे. भारत, कोरिया आणि इतर देशांसोबतच्या व्यापार करारांबद्दल अमेरिका सकारात्मक दिसत आहे. सणासुदीचा हंगाम संपल्यानंतर सोन्याचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झाला आहे. कमी दरात सोन्यात गुंतवणूक करणारे आता विक्री करण्याच्या मानसिकतेत दिसत आहेत. लग्नाचा हंगाम पुढील महिन्यापासून सुरू होत आहे. परंतु ज्यांना दागिने खरेदी करायचे आहेत त्यांनी ते आधीच खरेदी करून ठेवले आहेत.

## भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी सुरेश बाविस्कर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भाजपतर्फे जळगाव पश्चिम जिल्हा तीर्थक्षेत्र विकास आघाडीची बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी जिल्हा कार्यकारिणी जाहीर झाली आहे. यात अमळनेर येथील मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव श्री. सुरेश बाविस्कर यांची अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही कार्यकारिणी जाहीर झाली. जलसंपदामंत्री ना. गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांच्या नेतृत्वात, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, विभागीय संघटनमंत्री रवी अनासपुरे, खासदार स्मिताताई वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण व आमदार अमोल जावळे, जळगाव पश्चिम जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली २०२५ची ही जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीत पश्चिम जिल्ह्यातील ११ उपाध्यक्ष, तीन सरचिटणीस, १० चिटणीस व १७ सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. श्री. बाविस्कर यांच्या निवडीबद्दल जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून देवस्थानांच्या विकासाची आपणांस संधी लाभली आहे. तिर्थक्षेत्र स्थळांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही नूतन जिल्हाध्यक्ष श्री. बाविस्कर यांनी दिली.

## अमळनेर आगार मालामाल

पान १ वरून

**सणासुदीमुळे प्रवाशांचा प्रतिसाद** : ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना अर्ध्या दरात, तर ७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सवलत आय. त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. अनेक प्रवासी दिवाळी साजरी तथा सुट्ट्या घालवण्यासाठी प्रवास करीत असल्याने बसेसमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी वाढल्याचे दिसून आले.

**बस हाऊसफुल्ल** : प्रवाशांच्या सोयीसाठी जादा बसचे नियोजन करण्यात आले होते. शाळा, महाविद्यालयांना सुट्ट्या असल्याने सर्व फेऱ्या बंद करून या बस दिवाळीनिमित्त प्रवासी वाहतुकीसाठी धावत आहेत. सुट्ट्या निमित्त खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांनी त्यांच्या भाड्यांमध्ये खूप मोठी वाढ केली आहे आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असलेल्यांसाठी ही वाढ खूपच डोईजड आहे त्यामुळे त्यांनी लाल परीलाच आपलेसे केल्याने प्रवासी संख्येत मोठी वाढ झाली .



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## कुऱ्हे बुद्रुक शाळेस माजी विद्यार्थ्यांकडून संगणक संच भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील कुऱ्हे बुद्रुक येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा झाला. या मेळाव्याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी शाळेस निधी व संगणक संच भेट दिला आहे. दिवाळीनिमित्त गावात आलेले विविध क्षेत्रातील कार्यरत असलेले माजी विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमशील शिक्षक अशोक पाटील यांनी शाळा विकासासाठी माजी विद्यार्थ्यांना शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे आवाहन केले. माजी विद्यार्थ्यांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करून शाळेला आर्थिक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आयटी इंजिनिअर संदेश संतोष पाटील यांनी दहा हजार रुपये रोख दिले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी मिळून ६७ हजार ४०० रुपये निधी शाळा विकासासाठी दिला. मुंबई पोलीस प्रशांत आत्माराम पाटील यांनी शाळेस एक संगणक संच देण्याचे कबूल केले. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघाची स्थापना करून सर्वानुमते संदेश रवींद्र प यांची अध्यक्षपदी, संदेश समाधान पाटील यांची उपाध्यक्षपदी, अभिषेक भोसले यांची कार्याध्यक्षपदी जर मंगलेश समाधान पाटील यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकारी व माजी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक रियाज शेख यांनी स्वागत केले. स्नेहमेळावा यशस्वितेसाठी गावातील ज्येष्ठ पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, सतीमाता ट्रस्टचे पदाधिकारी तसेच सतीमाता युवा प्रतिष्ठानचे अनमोल सहकार्य लाभले.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# दिवाळी संपताच रेल्वे स्थानकावर प्रचंड गर्दी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीचे पर्व संपल्याने आता नागरिकांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर अमळनेर रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे.

राज्यातील विविध भागात नोकरी-व्यवसाय करणारे अनेक जण दिवाळी साजरी करून आपापल्या ठिकाणी रवाना होताना दिसून येत आहेत. ज्यांनी तिकिटे बुकींग केलेले नाहीत त्यांची तिकिटासाठी धावाधाव होत आहे. बहुतांश रेल्वे गाड्यांमध्ये आरक्षण फुल झाले आहेत. अनेकांना प्रतीक्षा यादीवर अवलंबून आहेत. अनेकांना नाईलाजास्तव



जनरल डब्यात प्रवास करावा लागतआहे. प्लॅटफार्मवर प्रवाशांची झुंबड उडत आहे. अमळनेर स्थानकावरून मुंबई, सुरत, अहमदाबादकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये मोठी गर्दी दिसून येत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे प्रशासनाने अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. घोषणा प्रणालीद्वारे प्रवाशांना सूचनाही केल्या जात आहेत. दिवाळी सणानंतर प्रवाशांची संख्या अचानक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यासाठी तिकीट तपासक आणि सुरक्षारक्षकांची अतिरिक्त नेमणूक केली आहे, अशी माहिती रेल्वेच्या सूत्रांनी दिली. बस स्थानकावरही अशीच स्थिती दिसत आहे. बसही मोठ्या फुल्ल असल्याचे दिसून येत आहेत.



# रस्त्यावर गवत विक्री करून हाकताहेत संसाराचा गाडा

## रत्नाबाई भिल, भिकुबाई भिल यांची संघर्षमय कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

सूर्य देवाचे आगमन होण्यापूर्वीच पहाटेच्या अंधूक प्रकाशात फरशी पुलाच्या एका कडेला रत्नाबाई भिल व भिकुबाई भिल या दोन महिला हल्ली जवळपास रोजच गवत विकताना दिसतात. दोन पैसे गोळा करून पोटाची खळगी भरण्यासाठी या महिला करत असलेल्या संघर्षाची कहाणी कौतुकास्पद आहे.

गावाबाहेरील माळावर, ओसाड शिवारात किंवा ओढ्याच्या काठावरून त्या गवत कापून आणतात. तेथे विषारी साप, नाग, विंचू आदींशी त्यांचा सामना होतो. अक्षरशः जीवावर उदार होऊन त्या हा व्यवसाय करतात असे म्हटले तरी फारसे वावगे होणार नाही .

पोटातील भुकेची आगीच्या तुलनेने सकाळची बोचरी थंडी त्यांना सहनीय वाटते.कुठल्यातरी कानाकोपऱ्यातील टपरीवरील स्वस्त चहाचा एक गरम घोट थोडी ऊब देऊन त्यांच्या सहशीलतेत वाढ करून जातो. . घरातील चिमुकले झोपेत असतानाच त्या चाऱ्यासाठी वणवण भटकतात. गवत कापून झाल्यावर त्याची पेंढी बांधतात. छोटी पेंढी 50 रुपयांना, तर मोठी पेंडी शंभर रुपयांना विकतात. ही पेंढी एका वाहनातून फरशी पुलावर आणतात. दुपारच्या उन्हातही त्यांची विक्री सुरू असते. भुकेचे कावळे पोटात काव काव करीत असतात. त्यातच कोणी पेंडी खराब खरेदी करण्यासाठी आला की भूक विसरायला होते. चार पैसे हाती आल्यावर त्यांच्या थकलेल्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलते . शहरातील अनेक गुरे पालक, दुभत्या जनावरांचे मालक, दूध विक्रेते त्यांच्याकडून हा चारा विकत घेतात. या छोट्याशा व्यवहारातून दोघांचाही फायदा होतो जनावरांनाही ताजे हिरवे मिळाल्याने त्यांचे पोट भरते . या महिलांच्या व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबीयांच्याही पोटाची खळगी भरते. दररोज साधारण तीनशे ते चारशे रुपयांची त्यांची कमाई होते. चारा विक्रीहाच त्यांच्या घराचा आर्थिक कणा आहे. या पैशातून घरखर्च,मुलांचे शिक्षण , दैनंदिन जीवनाच्या आवश्यक गरजा पूर्ण होतात. कधी पाऊस, कधी ऊन, तरीही त्यांचा प्रवास थांबत नाही. या माऊलींचा गवत विक्रीचा व्यवसाय फक्त उपजीविकेचे साधन नाही, तर जिद्द, आत्मसन्मान आणि स्वावलंबनाचे प्रतीक आहे. पुरुषप्रधान समाजात त्यांनी स्वतःच्या मेहनतीवर उभे राहून दाखवले आहे.अत्यांचा हा चारा विक्रीचा व्यवसाय एका सामान्य माणसाच्या असामान्य संघर्षाची जिवंत कहाणी आहे. या महिलांनी दाखवून दिले आहे की, परिस्थिती कितीही कठीण असो, मेहनतीचा हात आणि प्रामाणिकपणाची साथ असेल तर जीवन जगता येते.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची '
तसेच आपली
व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी
जाहिरात रूपाने
प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची
सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# अक्षय नवमी अन् भगवान विष्णूंची पूजा

कार्तिक शुद्ध नवमीच्या दिवशी भगवान विष्णू यांनी कूष्मांड दैत्याचा वध केला. त्यामुळे या तिथीला महत्त्व प्राप्त झाले आहे. या तिथीस भगवान विष्णू यांची पूजा करणे महत्त्वपूर्ण मानले जाते.

**आरोग्य व्रत**

कार्तिक शुद्ध नवमीस अगर अन्य कोणत्याही महिन्यातील शु. नवमीस उपवास करून दशमीस स्नान करून भगवान श्रीविष्णू यांची पूजा करावी. फळ-फूल अर्पण करून पक्वान्नांचा नैवेद्य दाखवावा. तसेच चक्र, गदा, मुसळ, धनुष्य व खड्ग या आयुधांची लाल फुलांनी पूजा करून गोड अन्नपदार्थांचा नैवेद्य दाखवावा. कमळावर सोनेरी किंवा चांगल्या रंगाचे अष्टदल काढून प्रत्येक पाकळीवर पूर्वादिक्रमाने मन, श्रोत्र, त्वचा, चक्षू, जिव्हा, घ्राण व बुद्धी यांची पूजा करावी.

**'अनामयानींद्रियाणि प्राणश्च चिरसंस्थितः ।**
**अनाकुला च मे बुद्धिः सर्वेस्युर्निरुपद्रवाः ॥**
**मनसा कर्मणा वाचा मया जन्मनि जन्मनि ।**
**संचितं क्षपयत्वेनः कालात्मा भगवान हरिः ॥'**

अशा मंत्राने यांची प्रार्थना केल्यास रोगी निरोगी होतो व दीर्घकालपर्यंत त्याची प्रकृती चांगली राहते.

**कूष्मांड नवमी**

कार्तिक शुद्ध नवमीस हे नाव आहे. या दिवशी कोहळा दान देण्याचे व्रत करतात. त्याचा विधी असा- कोहळा गाईच्या तुपात बुडवितात. त्याची पूजा करतात. मग तो पंचरत्ने, फळे, अन्न, दक्षिणा यासह पुढील मंत्राने ब्राह्मणाला दान देतात.



**' कूष्मांडं बहुबीजाढ्यं ब्रह्मणा निर्मितं पुरा । दास्यामि विष्णवे तुभ्यं पितृणां तारणाय च ॥'**

**तुलसीवास**

कार्तिक शुद्ध नवमी रोजी प्रातःस्नान करून घरात वाळूची वेदी बनवावी. त्यावर तुळशीची सपर्ण फांदी, तुळशीचे संपूर्ण झाड, चांदीची सपर्ण फांदी व सोन्याची तुळशीची मंजिरीयुक्त प्रतिकृती ठेवून यथाविधी पूजन करावे. यथाऋतू फळे- फुले अर्पावीत. लांब वात असणारा एक तुपाचा दिवा अखंड प्रज्वलित ठेवावा व निराहार राहून रात्री कथा श्रवण करून मग जमिनीवर झोपावे. याचप्रकारे नवमी, दशमी व एकादशीस करून मग द्वादशीस (रेवतीचा तृतीय चरण असल्यास तो सोडून मग) ब्राह्मणदंपतीस दानधर्म करून भोजन द्यावे व मग आपण जेवावे.

**तुळशी विवाह**

पद्मपुराणानुसार कार्तिक शुद्ध नवमीला तुळशी विवाहाचा उल्लेख आढळतो. मात्र इतर ग्रंथांच्या मते प्रबोधिनी एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत पाच दिवस अधिक फलदायी होतो. विवाहाच्या पूर्व दिवशी तुळशी वृंदावन सारवून सुशोभीत करतात. वृंदावनात ऊस, झेंडूची फुले घालतात व तुळशीच्या मुळात चिंचा, आवळे ठेवतात. काही लोक सकाळी, काही सायंकाळी तुळशी विवाह लावतात. व्रत करताना विवाहापूर्वी तीन महिने आधीपासून तुळशीला पाणी घालून टवटवीत ठेवावे. प्रबोधिनी किंवा भीष्मपंचक किंवा ज्योतिःशास्त्रोक्त मुहूर्तावर तोरण बांधून, मंडप बनवून, सोबत आणखी चार ब्राह्मण घेऊन गणपती-मातृकापूजन, नांदी श्राद्ध व पुण्याहवाचन करून टवटवीत अशा तुळशीबरोबरच सोन्याची लक्ष्मी-नारायण यांची मूर्ती व चांदीची तुळस चांगल्या आसनावर प्रतिष्ठित करावी (पूर्वाभिमुख) व यजमानांनी सपत्नीक उत्तराभिमुख बसून ' तुळशी विवाह विधी' नुसार 'वर 'पूजन (भगवान विष्णुचे पूजन), तसेच कन्या. ' तुळस ' हिचे कन्यादान इत्यादी विधी करावेत.

**त्रिरात्र तुळशी व्रत**

कार्तिक शुद्ध नवमीपासून तीन दिवस हे व्रत करतात. लक्ष्मीनारायणाच्या सुवर्णमूर्तीची तुळसीखाली पूजा, विष्णुहोम, विष्णुश्राद्ध, दाम्पत्यपूजा व द्वादशीला व्रताची सांगता, असा याचा विधी आहे. फल- संतती, संपत्ती व स्वर्गप्राप्ती.

**आवळा नवमी**

कार्तिक शुद्ध. नवमी रोजी व्रतपूजा, तर्पण व अन्नदान केल्यास अनंत फलप्राप्ती होते. पूर्वाण्हव्यापी तिथी यावेळी घेण्याची प्रथा आहे. जर हे दोन्ही दिवस नसेल अगर दोन्ही दिवस असेल तर मग-

**' अष्टम्या नवमीविद्धा कर्तव्या फलकांक्षिणा ।**
**न कुर्यान्नवमीं तात् दशम्या तु ददाचन । '**

यानुसार पूर्वविद्धा तिथीच घेणे संयुक्तिक होय. या दिवशी केलेली जपतपपूजादी कृत्ये, तसेच दानपुण्यादी लाभ ' अक्षय ' स्वरूपाचे असतात म्हणून ही ' अक्शय नवमी ' याही नावाने ओळखली जाते. या दिवशी गाय, सोने, वस्त्रालंकार इत्यादींच्या दानामुळे कर्मगतीनुसार इंद्रत्व, शूरत्व वा राजेपद मिळते. इतकेच नव्हे तर ब्रह्महत्यादी पापांपासून मुक्ती मिळते. हीच तिथी ' धात्रीनवमी ' व ' कूष्मांड नवमी ' या नावांनीही ओळखली जाते.

**' पिता पितामहाश्चान्य अपुत्रा ये च गोत्रिणः ।**
**ते पिबन्तु मया दत्तं धात्रीमूलेऽक्षयं पयः ॥**
**आब्रह्मस्तंबपर्यंत देवर्षिपितृमानवः ।**
**ते पिबन्तु मया दत्तं धात्रीमूलेऽक्षयं पयः ।'**
**या मंत्रांनी आवळ्याच्या झाडाशी मुळाशी दुधाची धार धरून**
**' दामोदर निवासायै धात्र्यै देव्यै नमोनमः ।**
**सूत्रेणानेन बध्नोमि धात्रि देवि नमोऽस्तु ते ॥ '**
**अशा मंत्राने झाडाभोवती दोऱ्याचे वेढे द्यावेत. नंतर निरांजन अगर कर्पुरारती ओवाळून ' यनिकानिज पापानि... ॥'** असा मंत्र म्हणत झाडाला प्रदक्षिणा घालाव्यात. त्यानंतर पिकलेले कूष्मांड (कोहळा) घेऊन त्यात सोने, चांदी, पैसे इत्यादी ठेवून त्याची गंधाक्षतपुष्पांनी पूजा करावी.

**' कूष्मांडं बहुबीजाढ्यं ब्रह्मणा निर्मितं पुरा ।**
**दास्यामि विष्णवे तुभ्यं पितृणां तारणाय च । '**

अशी प्रार्थना करून सुयोग्य ब्राह्मणास कोहळा दान द्यावा.

# योगी पुरुष : सद्गुरू शंकर महाराज

सद्गुरू शंकर महाराज यांचा जन्म अंदाजे सन १८०० मध्ये मंगळवेढे (पंढरपूर) येथे उपासनी कुटुंबात झाला. साधारणपणे १८०० ते १९४७ दरम्यानचा त्यांचा हा कार्यकाळ होता. गुरुवर्य श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराजांकडून त्यांनी स्पर्श दिक्षा घेतली. धनकवडी (पुणे) येथे श्री शंकर महाराजांनी वैशाख शुद्ध अष्टमी शके १८६९ म्हणजे सोमवार, २४ एप्रिल १९४७ या दिवशी महासमाधी घेतली. ' पंढरी जळेपर्यंत आम्हाला आराम करायचाय ' असे सांगून अक्कलकोट स्वामी आपल्या भक्तांची जबाबदारी लाडक्या शिष्यावर सोपवून निजानंदी निमग्न झाले. तो शिष्योत्तम म्हणजेच सद्गुरू श्री शंकर महाराज. त्यांचा दरवर्षी कार्तिक शुद्ध अष्टमीस प्रकट दिन साजरा होतो. यंदा हा प्रकट दिन गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी सर्वत्र साजरा झाला.

श्री शंकर महाराज अलौकिक, सिद्ध, महान नाथपंथीय योगी होते. ज्ञानी होते. अवधूत होते आणि अवलियाही होते. अष्टसिद्धी त्यांना वश होत्या. त्यांची जगावर पूर्ण सत्ता होती आणि आजही असल्याची मान्यता आहे. शंकर महाराजांनी आपल्या भक्तांवर आईच्या ममतेने माया केली. त्यांची दुःखे दूर केली. प्रपंच सांभाळून परमार्थात गती कशी करावी, हे समजावून सांगितले. सदगुरू शंकर महाराज म्हणत असत, की ' मी आणि माझा गुरू वेगळा नाही. ' श्री स्वामी समर्थ ' हा माझ्या गुरूंचा जप आहे. त्यांचे नाम घेतले की मला ते पोहोचते. स्वामी समर्थांना सदगुरू शंकर महाराज ' मालक ' म्हणत असत.

पुण्याचे डॉक्टर धनेश्वर महाराजांचे अंतरंग शिष्य होते. मात्र त्यांना महाराजांच्या वयाबद्दल संदेह होता. त्यांनी महाराजांची परवानगी घेऊन त्यांच्या काही मेडिकल टेस्ट करून घेतल्या. त्या टेस्टचा रिझल्ट आल्यावर डॉक्टरांना भोवळ आली. कारण रिझल्टमध्ये महाराजांचे वय १५२ वर्षे आले. महाराजांच्या अनेक भक्तांची जन्म आणि मृत्यूची तारीख १३ आहे. महाराजांना १३ हा अंक विशेष प्रिय. याचा अर्थ सांगताना महाराज सांगत असत, की ' सब कुछ तेरा, कुछ नही मेरा ' हे जीवन व तुझे सारे ऋणानुबंध तुझेच आहेत. तू तुझ्या मागील जन्माचा कर्मभोग घेऊन आला आहेस. तो तुला भोगलाच पाहिजे. कर्मभोगातून मोकळा झाल्याशिवाय तुला ईश्वरप्राप्ती होणार नाही.

महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक स्व. प्र. के. अत्रे खरे नास्तिक होते. परंतु शंकर महाराजांचे ते निस्सीम भक्त होते. त्यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला. त्यांच्या मृत्यूपूर्वी महाराजांनी त्यांच्या दारावर १३ वेळा थाप मारून त्यांना मृत्यूची चाहूल दिली होती. त्यांना १३ जून १९६९ रोजी देवाज्ञा झाली. ते महाराजांच्या चरणी विलीन झाले. पाथर्डीच्या माधवनाथ बाबांना समाधीनंतर ५४ वर्षांनंतर पावागडचा डोंगर चढताना महाराज भेटले. त्यांनी माधवनाथांना पाच हॉटेलमध्ये चहा पाजला. प्रत्येक वेळी हॉटेलचे बिल १३ रुपये झाले. हॉटेलचे बिल देताना महाराज १०० ची नोट देत असत. पण उरलेले पैसे परत घेत नसत. कार्तिक शुद्ध अष्टमीला प्रगट झालेली चैतन्याची ज्योत वैशाख शुद्ध अष्टमीला चैतन्यस्वरूपात विलीन झाली.

संपवूनी आपूला अवतार। निजधामा गेले निरंतर । भक्त झाले पोरके । अवघी जनता शोकाकुल झाली । सर्व भक्तमंडळी हळहळली.

**श्री शंकर महाराजांना साष्टांग दंडवत. संतवर्य श्री योगीराज प्रभू शंकर महाराज! वंदन करूनी चरणी अर्पितो भक्तीचा साज...!!**
**अतर्क्यलीला, अगाध महिमा, अमर्याद करणी! सदैव आम्ही नतमस्तक हो, आपल्याच चरणी...!!**
**धरले आम्ही भावे तुमचे, जगी घट्ट चरण! सोडणार कधी नाही आम्ही, आले जरी मरण ...!!**
**नित्य घडावे स्मरण नि पूजन, देहच रंगावा! शंकर महाराजांचा जयजयकार मुखी व्हावा...!!**
**!! अनंत कोटि ब्रह्माण्ड नायक राजाधिराज योगीराज सच्चिदानंद भक्तवत्सल सद्गुरू श्री शंकर महाराज की जय...!!**

**शंकर महाराजांबद्दलच्या ' या ' गोष्टी माहिती आहेत का?**

महाराष्ट्रात मैला-मैलावर कुलदैवत बदलत राहते. त्यामुळे अलीकडच्या गावात अंबाबाईला मानणारे लोक पलीकडच्या गावात गेले की भगवान शंकर यांना देव समजतात. पण महाराष्ट्रात सगळीकडे ' मे शंकर का रहनेवाला, मेरा नाम शंकर ' असे म्हणून शंकर महाराजांना मानणारा एक वर्ग निर्माण झाला आहे. महाराजांची पूजा घर, दुकान आणि कामाच्या ठिकाणी सकाळी-सकाळी नेहमी केली जाते. महाराजांचा भक्तगण महाराष्ट्रासोबतच भारतभरात आहे. महाराजांची एक खासियत म्हणजे त्यांना सिगारेट चालते. ही सिगारेट पेटवून त्यांना नैवेद्य दाखविले जातात. यामागे भक्तगण कारण सांगतात, की ' महाराज सांगतात, की सिगारेटच्या धुरात मी त्रैलोक्य फिरून येतो.'



शंकर महाराजांबद्दल काही गोष्टी आवर्जून सांगितल्या जातात. त्यामध्ये महाराजांच्या मूळ ठिकाणाबद्दल माहिती देण्यात आली आहे. महाराजांचे मूळ नेमके कुठले आहे, याबद्दल अधिकृत कोणतीही माहिती नाही. असे सांगितले जाते, की त्यांचे मूळ गाव नाशिक जिल्ह्यातील अंतापूर आहे. तेथील एका माणसाच्या स्वप्नात शंकर आले होते आणि त्यांनी या बाळाची माहिती त्यांना दिली. त्यानंतर महाराजांना याच गृहस्थाने वाढवले. परंतु जेव्हा महाराज जायला निघाले तेव्हा त्यांनी याच माता-पित्याला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद दिला होता. त्यानंतर महाराजांचे वय किती हाही मोठा वाद आहे. त्यांचे वय जवळपास १६५ वर्षे असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. एकदा एका डॉक्टरने त्यांना तपासले असता त्याने त्यांचे वय १५० वर्षे असल्याचा दावा केला होता. महाराजांना जवळपास जगभरातील सर्वच भाषा येत होत्या. त्यांनी एकदा एक रशियन जोडपे त्यांच्याकडे आले होते. त्या जोडप्यासोबत रशियन भाषेत बोलणे झाल्याचे भक्तांनी सांगितले होते. महाराजांनी हैद्राबादच्या निजामाला त्याचे संस्थान खालसा होणार याबद्दल माहिती दिली होती. पहिला निजाम महाराजांचा भक्त होता. दुसरा निजाम महाराजांना मानणारा नव्हता. त्यामुळे त्याने महाराजांना हाकलून लावले होते. पण नंतर जेव्हा तेथील नदीला पूर आला तेव्हा निजामाला त्याची प्रचिती आली. काही दिवसांमध्येच त्याचे संस्थान खालसा झाले. महाराजांबद्दल दंतकथाही सांगितल्या जातात. महाराजांना मानणारा भक्तगण वर्ग मोठा असून, ते कायम धनकवडी येथील मठामध्ये दर्शनासाठी हजेरी लावतात. तेथे आलेल्या प्रत्यक्ष भक्तगणांच्या तोंडात ' शंकर महाराज की जय हो ' हे वाक्य आवर्जून असते.

**जन्म व पूर्व इतिहास**

शंकर महाराज एकदा म्हटले होते, की आम्ही कैलासाहून आलो. नावही ' शंकर '. ते खरोखरच भगवान शिव यांचे वैराग्य-संपन्न अंशावतार असावेत. नाशिक जिल्ह्यात अंतापूर नावाचे गाव आहे. तेथे कुणी चिमणाजी नावाचे गृहस्थ राहात होते. पोटी मूल-बाळ नव्हते. ते भगवान शिव यांचे भक्त होते. एकदा त्यांना स्वप्नात दृष्टान्त झाला. ' रानात जा. तुला बाळ मिळेल. घेऊन ये.' ते त्या दृष्टान्ताप्रमाणे रानात गेले. तेथे त्यांना हा दोन वर्षांचा बाळ मिळाला. शंकराचा प्रसाद म्हणून त्याचे नाव ' शंकर ' ठेवले. ' शंकर ' या माता-पित्याजवळ काही वर्षे राहिला. नंतर या बाळाने माता-पित्यांनाच आशीर्वाद दिला, की ' तुम्हाला पुत्रप्राप्ती होईल.' आशीर्वाद देऊन शंकर बाहेर पडला. नाम नाही, रूप नाही, एक स्थान नाही. श्री शंकर महाराजांना नेमके एक नाव नाही. ते अनेक नावांनी वावरत. ' शंकर ' या नावाप्रमाणेच ' सुपड्या ', ' कुंवरस्वामी ', ' गौरीशंकर ' अशा नावांनीही ते ओळखले जात. ते कधी एका स्थानी नसत. त्रिवेणी संगम, सोलापूर, अक्कलकोट, त्र्यंबकेश्वर, नाशिक, नगर, पुणे, हैदराबाद, तुळजापूर, औदुंबर, श्रीशैल अशा स्थानी त्यांची भटकंती असायची. सांगितली एवढीच स्थाने असतील असेही नाही. म्हणजे शंकर महाराजांचे ' नाम-रूप-स्थान ' सांगणे कठीण आहे. कारण खऱ्या अर्थाने ते वैराग्यसंपन्न होते. श्री शंकर महाराज योगीराज होते. याचा अनेकांनी अनेक प्रकारे प्रत्यय घेतला आहे. ते स्वतः मात्र नेहमी म्हणत, ' सिद्धीच्या मागे लागू नका! ' त्यांनी आपले योगसामर्थ्य कळत-नकळत अनेकांच्या प्रत्ययाला आणून दिले. काहींना ' सिद्धी ' हवी असते ती ' प्रसिद्धी 'साठी. त्याने नावलौकिक वाढतो, धन-दौलत मिळते, शिष्य-परिवार वाढतो. म्हणून श्री शंकर महाराज म्हणत ' सिद्धीच्या मागे लागू नये ' त्यांना स्वतःला सिद्धी प्राप्त होत्या. परंतु त्यांनी धन-दौलत, नावलौकिक वा शिष्य-परिवारादी उपाधी मागे लावून घेतल्या नाहीत. ते स्वतः खऱ्या अर्थाने सिद्धींच्या मागे लागले नाहीत. पण शंकर महाराज अलौकिक पुरुष होत, हे चिकित्सक विद्वानांनाही मान्य होते. पुण्यात आप्पा बळवंत चौक प्रसिद्ध आहे. आप्पा बळवंत मेहेंदळे यांचा वाडा चौकातच होता. बळवंतराव मेहेंदळे हे पानिपतच्या लढाईत लढले होते. त्यावेळी ' आप्पा बळवंत ' हा केवळ बारा वर्षांचा होता. सरदार मेहेंदळे यांचा वाडा होता म्हणून त्या चौकाचे नाव 'आप्पा बळवंत चौक ' मेहेंदळे यांच्या घराण्यातील ' ताईसाहेब मेहेंदळे ' शंकर महाराजांमुळे प्रसिद्धीस आल्या. एक दिवस शंकर महाराजांनी ताईसाहेब मेहेंदळे यांच्या गळ्याला बोटाने स्पर्श केला नि सांगितले, ' ज्ञानेश्वरी सांग.' ताईसाहेब ज्ञानेश्वरीवर प्रवचने करू लागल्या.'

**सद्गुरू शंकर महाराजांच्या लीला**

सद्गुरू श्री शंकर महाराज हे थोर अवलिया होते, हे नव्याने सांगायची गरज नाही. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले नाशिक येथील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील पुजारी स्व. रामभाऊ अकोलकर यांना शंकर महाराजांचा सहवास लाभला. शंकर महाराज हे रामभाऊंचे दैवत बनले होते. रामभाऊंच्या घरी शंकर महाराज राहात असत. त्यांच्या वाड्यात महाराजांची मूर्ती आणि फोटो आहे.

**महाराज नेहमी भक्तांना सद्गुरूचा महिमा सांगत**

योगीराज श्री शंकर महाराज नेहमी भक्तांना समोर बसवून सद्गुरूचा महिमा सांगत. ते जेव्हा अक्कलकोटला येत तेव्हा आपल्या आईला मुलाने भेटावे अशा प्रेमाने साश्रुमनाने श्री स्वामींच्या समाधीचे दर्शन घेत. तासन्तास वटवृक्षाच्या छायेत राहात. संपूर्ण रात्रभर जागरण करीत व रात्री गुरू-शिष्यांच्या भेटी होत. त्यांच्यासोबत शुभराय मठाचे महंत जनार्दन बुवा व जानुबुवा असत. श्री स्वामी समर्थ महाराज हे आमचे एकमेव गुरू आहेत. त्यांच्या स्थानावर आम्ही येऊन सुखावतो. आपल्या सदगुरू माऊलीच्या दिव्य समाधीवर माझ्या हातून अनेक चमत्कार घडतात. अक्कलकोटातील अनेक मान्यवर व्यक्ती महाराजांच्या भेटीला येत. महाराजांची विभिन्न नयनरम्य रूपे पाहून नम्रतापूर्वक लीन होत असत. अशा वेळी अक्कलकोटला जमलेल्या आपल्या भक्तांना महाराज सांगत माझे गुरू श्री स्वामी समर्थ यांना नित्य स्मरा ही माझी आज्ञा आहे. आपल्या संपूर्ण आयुष्यात श्री स्वामींची पुण्यतिथी व प्रगट दिन महाराज साजरे करायला विसरले नाहीत. योगीराज श्री शंकर महाराज नेहमी म्हणत असत, " पानी पीना छान के और गुरू करना जान के " पाणी जसे गाळून प्यावे. तसेच सद्गुरूंची खरी परीक्षा शिष्याने घेऊनच त्याला ओळखावा. आपल्या मतलबापोटी भक्तांना माळ घालून नारळ हातात देऊन, त्यांच्याकडून पैसा उकळून त्यांना शिष्य करणारे व आपल्या सर्व रोगांवर उपाय सांगणारे, भक्तांचे बदलायचे ढोंगी नाटक करणारे, खोट्या आशा दाखविणाऱ्या गुरूंबद्दल महाराजांना अतोनात चीड होती. आपल्या आयुष्यात दहा हजार शिष्य करून चौदाशे वर्षे जगलेले चांगदेव आयुष्यभर कोरेच होते हे महाराजांना ज्ञात होते. आपण गुरूकडे धाव न घेता गुरूच शिष्याच्या शोधात आपल्याकडे येतो. श्री स्वामी समर्थ पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात श्री शंकर महाराजांची वाट पाहत होते. गरज दोघांना होती. जगाच्या कल्याणाची!

## श्री शंकर महाराज यांची मनोभूमिका

**श्री शंकर महाराजांची पारमार्थिक वैराग्य-संपन्न मूर्ती केवढ्या उच्च भूमिकेवर होती. ते त्यांच्या एका सहज उद्गारातून दिसते. ते म्हणाले होते, की ' मला काही कमी नाही, कारण मला कमावण्यासारखे काही नाही. माझ्याजवळ काही नाही म्हणून मला गमावण्यासारखेही काही नाही.'**

१) सुख-शांती हवी असेल, तर इच्छा, ईर्षा, असूया, महत्त्वाकांक्षा, हावरेपणा सोडून दिल्याने अहंकाराने सतत अस्थिर होणारे मन स्थिर होईल. २) सामाजिक-धार्मिक-नैतिक अधिष्ठान गुरूंमुळे प्राप्त होते. ते अधिष्ठान विसरून लोक केवळ लौकिक सुखामागे लागल्याने सत्य-नीती हा धर्म होण्याऐवजी पैसा हा धर्म झाला आहे. गुरूस ईश्वर मानून त्यांचे अधिष्ठान जपले पाहिजे. ३) गुरू व देव याविषयी उत्कट प्रेम व दृढ श्रद्धा हवी. ४) जे गुरूला ईश्वर मानून दृढ श्रद्धेने भजतात त्यांचाच गुरूकृपेने उद्धार होतो. ५) देव सर्वव्यापी आहे असे लोक मानतात. पण जे बोलतात ते आचरणात आणत नाहीत. प्रथम आत्मबोध करावा तरच आत्मसाक्षात्कार घडून येईल.६) साधनमार्गात अपेक्षा आणि पूर्ती महत्त्वाची असते. पण त्यासाठी विश्वास व श्रद्धा हवी. विद्वत्तेने देवाला जोखू नये. विद्वान मंडळींना शंकाच फार येतात. त्यासाठी त्यांनी आपल्याच अंतरंगात डोकावून पाहावे. त्यायोगे शंका नाहीशा होऊन कार्यप्रवृत्तीची प्रेरणा मिळते. ७) स्वार्थीपणाचा बाजार भरला आहे. त्यातूनच अपेक्षा वाढतात. स्वार्थासाठी मित्राला मदत, कीर्तीसाठी दानधर्म, कौतुकासाठी देणगी मग या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, की लगेच राग येतो. तोच मुळी आत्मकल्याणाच्या आड येतो. ८) आशा, इच्छा, हव्यास, वित्त यांची हाव कधीच संपत नाही. मग त्यापोटी दुःख-वेदना होणारच. बोटीतून प्रवास म्हटला की बोट हलणारच. मूल हवे तर प्रसूतीचा त्रास सोसलाच पाहिजे. शरीर म्हटले की व्याधी आलीच. ९) जे आत्मदर्शन प्राप्ती करुन घेतात त्यांना जन्म-मृत्यू नसतो. ते जगद्उद्धारार्थ अवतार म्हणून पुन्हा येतात. १०) सिद्धीपेक्षा भक्ती श्रेष्ठ, ११) सद्गुणांची वाढ झाली तर माणसात देवत्व प्रकट होते. १२) आम्ही कैलास रहिवासी शंकर आहोत. लोकांना देव समजावून सांगण्यासाठी येथे आलो. मनुष्य जन्म असेतोवरच हे समजून घ्या. आत्मकल्याण करून घ्या. जीवनाचे सार्थक करा.'

